अंबरनाथच्या कचराभूमीचा प्रश्न अखेर निकाली

अंबरनाथ : अंबरनाथ पूर्वेतील मोरीवली पाड्याशेजारी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली बेकायदा कचराभूमी बुधवारपासून बंद केली जाणार आहे. उच्च न्यायालयाने एक महिन्याची मुदत दिल्यानंतर अंबरनाथ नगरपालिकेने चिखलोली येथे नव्या कचराभूमीसाठी परवानगी मिळवली आहे. नुकतीच ठाणे जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी चिखलोलीतील आरक्षित भूखंडावर कचरा टाकण्यास परवानगी दिल्यानंतर बुधवारपासून या कचराभूमीवर कचरा टाकला जाणार आहे. अंबरनाथ नगरपालिकेने गेल्या काही वर्षांपासून मोरीवली पाडा या भागात कर्जत-काटई महामार्ग आणि कल्याण-बदलापूर राज्य मार्गाच्या जोडमार्गावर बेकायदा पद्धतीने कचरा टाकण्यास सुरुवात केली होती. अंबरनाथ शहराचा विस्तारणारा भाग असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रहिवासी संकुले उभी राहिली आहेत. बांधकाम व्यावसायिकांकडून ही कचराभूमी काही दिवसात हटवली जाईल, असे आश्वासन मिळाल्याने नागरिकांनी या भागात घरे विकत घेतली. मात्र कचराभूमीचा प्रश्न रखडल्याने नागरिकांना कायम दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत होता. या प्रकरणी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी शेकडो आंदोलने केली. क्षमता संपल्यानंतरही पालिका प्रशासन या ठिकाणी कचरा टाकत होते. सातत्याने आग लागण्याच्या घटनांमुळे शहराच्या मोठ्या भागात धुराचे साम्राज्य पसरत होते. याची दखल राष्ट्रीय हरित लवाद, उच्च न्यायालयानेही घेतली. या कचराभूमीच्या समोरच अंबरनाथ शहरातील कनिष्ठ न्यायालय सुरू होण्याच्या प्रतीक्षेत आहे. त्यावरून गेल्या महिन्यात उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी अंबरनाथ नगरपालिकेच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली होती. तसेच अंबरनाथ नगरपालिकेला एक महिन्याचा अवधी दिला होता. त्यानंतर अंबरनाथ नगरपालिकेने कचराभूमीच्या नव्या जागेसाठी हालचाली सुरू केल्या. अखेर अंबरनाथच्या चिखलोली भागातील सर्वेक्षण क्रमांक १३२ या कचराभूमीसाठी आरक्षित जागेची निश्चिती झाली. पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकत्याच झालेल्या दूरचित्र संवाद बैठकीत चिखलोली येथील जागेचा वापर करण्यासाठी परवानगी दिली.

डोंबिवली रेल्वे स्थानकात १४३४ तर कोपर रेल्वे स्थानकात १५० नागरिकांच्या

लसीकरण प्रमाणपत्राची पडताळणी

डोंबिवली : शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोविड लसीकरणाचे दोन डोस पूर्ण होऊन १४ दिवस पूर्ण झालेल्या नागरिकांना रेल्वे प्रवासाची अनुमती देण्यात आली आहे. सदर नागरिकांना रेल्वे पास मिळणे सुकर व्हावे याकरीता त्यांचे कोविड लसीकरण प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरीता महापालिका कार्यक्षेत्रात कल्याण, डोंबिवली, कोपर, टिटवाळा, आंबीवली, शहाड, ठाकुर्ली या रेल्वे स्थानकांवर महापालिकेने सकाळी ७ ते दुपारी ३ व दुपारी ३ ते रात्री ११ या दोन सत्रात महापालिका कर्मचाऱ्यांचे मदत कक्ष उभारण्यात आले आहेत. बुधवारी सकाळी ७ वाजता महापालिका क्षेत्रातील सर्व रेल्वे स्थानकांवर महापालिकेचे कर्मचारी हजर होते. या पहिल्या सत्रात कल्याण पूर्व रेल्वे स्थानक येथे १६८ , कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक येथे २८४ , डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक येथे ८२७ , डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानक येथे ६०७ , ठाकुर्ली रेल्वे स्थानकावर १९९, शहाड रेल्वे स्थानकावर १५ , आंबिवली रेल्वे स्थानकावर ५१ , कोपर रेल्वे स्थानकावर १५० , टिटवाळा रेल्वे स्थानकावर २०४ अशा एकुण २५०६ नागरिकांच्या लसीकरण प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात आली. दुपारच्या दुस-या सत्रातही नागरिकांच्या लसीकरण प्रमाणपत्राची पडताळणी केली जात आहे. नागरिकांनी सदर पडताळणीसाठी गर्दी न करता प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

लोकल ट्रेनमध्ये प्रवास करण्याबाबत राज्यसरकारच्या मार्गदर्शक सूचना

उल्हासनगर दि ११: येत्या १५ ऑगस्ट पासून सर्वसामान्य नागरिकांना लोकलने प्रवास करण्याची मुभा मिळणार आहे मात्र त्यासाठी नागरिकांनी लसीकरणचे दोन्ही डोस पूर्ण करणे आवश्यक असून याबाबत राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचना उल्हासनगर महानगरपालिकेने प्रसिद्धी पत्रकाद्वारे जारी केल्या आहेत . १५ ऑगस्टपासून कोविड लसीकरणाचे २ डोस घेऊन १५ दिवस पूर्ण केलेल्या नागरिकांना रेल्वे तिकीट काउंटरवर मासिक ट्रेन पास दिला जाईल. रेल्वे पास वितरण प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि संभाव्य गर्दी टाळण्यासाठी, उल्हासनगर, विठ्ठलवाडी आणि शहाड तिकीट काउंटरजवळ सकाळी ७. ते रात्री ११ या वेळेत २ शिफ्टमध्ये स्वतंत्र हेल्प डेस्क उभारण्यात येईल.

जे नागरिक मूळ शासकीय ओळखपत्र आणि त्याची छायाप्रती (शक्यतो आधार कार्ड) सोबत कोविड -१९ लसीकरण प्रमाणपत्राची प्रत आणि छायाचित्र घेऊन येतात, त्यांना प्रथम महानगरपालिकेच्या हेल्प डेस्कवर कागदपत्रांची पडताळणी करावी लागेल आणि त्यावर स्वाक्षरी केली जाईल. हेल्प डेस्क कर्मचारी आणि कृपया ते प्रमाणित करा. साक्षांकित प्रमाणपत्र आणि ओळखपत्र (शक्यतो आधार कार्ड) रेल्वे तिकीट काउंटरवर दाखवल्यानंतर, संबंधित नागरिकाला प्रवासासाठी विहित शुल्क भरल्यानंतर मासिक ट्रेन पास मिळेल असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे निर्देश दिले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस आंदोलनाच्या पवित्र्यात

सायझिंग व्यावसायिकांच्या बंद मुळे यंत्रमाग व्यवसायिक हवालदिल

भिवंडी :दि.११(शरद धुमाळ) भिवंडी या यंत्रमाग उद्योग नगरीत यंत्रमाग व्यवसायास पूरक व्यवसाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सायझिंग व्यवसायिकांनी आठ दिवसांचा बंद पुकारल्याने यंत्रमाग व्यवसायिक हवालदिल झाले असून सायझिंग व्यवसायिकांनी या बाबत तात्काळ निर्णय न घेतल्यास यंत्रमाग व्यवसायिकांची पाठीशी उभे राहून जे सायझिंग व्यवसायिक आपले उद्योग सुरू करू इच्छितात त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस संरक्षण देणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस भिवंडी शहरा जिल्हाध्यक्ष भगवान टावरे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे .

मागील दीड वर्षांपासून देश कोरोनाशी लढा देत असताना लॉक डाऊन मुळे सर्व व्यवसाय उद्योग अडचणीत आले असताना भिवंडी शहरातील यंत्रमाग उद्योग आर्थिक डबघाईचा सामना करीत असताना आता काही प्रमाणात त्यात सुधारणा होत आहे अशा काळात यंत्रमाग व्यवसायिकांनी व्यवसाय सुरू करण्यासाठी कच्चा माल खरेदी केला असता सायझिंग व्यवसायिकांनी बंद पुकारल्याने यंत्रमाग उद्योजक पुन्हा आर्थिक संकटात आला असून भाव वाढीसाठी सायझिंग व्यवसायिक बंद करत आहेत हे चुकीचे व अडवणूक करणारे आहे असा आरोप भगवान टावरे यांनी केला आहे. सायझिंग व्यवसायिक प्लास्टिक कचरा जाळून पर्यावरणाचा ऱ्हास करीत असतानाच शहरातील नागरीकांच्या आरोग्याशी खेळत असून त्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळ कारवाई करीत नाहीत या बाबत आश्चर्य व्यक्त करीत बेकरी साठी परवाना पास घेऊन मोठ्या प्रमाणावर लाकडे सायझिंग मध्ये जाळली जात आहेत त्याकडे कानाडोळा व्हावा यासाठी सायझिंग व्यवसायिकांनी बंद पुकारला असल्याचा आरोप शेवटी भगवान टावरे यांनी केला आहे .

DHENU BUILDCON INFRA LIMITED
Office No. 4 Building No. 4, Vahatuk Nagar, Amboli, Andheri (West), Mumbai- 400 058
Contact No.: 7977599535 CIN: L10100MH1909PLC000300
Email: dhenubuildcon@gmail.com Website: www.dhenubuildconinfra.com
EXTRACT FROM THE STATEMENT OF UN-AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30/06/2021
(Rupees in Lakhs except EPS)

Sr No.	PARTICULARS	Quarter ended 30.06.2021 (Unaudited)	Quarter ended 30.06.2020 (Unaudited)	Year ended 31.03.2021 (Audited)
1	Total Income from Operations (net)	0	0	0
2	Net Profit/ (Loss) for the period (before tax and Exceptional items)	(1.11)	(21.17)	(133.17)
	Net Profit/ (Loss) for the period before tax, (after Exceptional items)	(1.11)	(21.17)	(133.17)
3	Net Profit/ (Loss) for the period after tax (after Exceptional items)	(1.11)	(21.17)	(98.80)
4	Total Comprehensive Income for the period[Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	(1.11)	(4.55)	(76.18)
5	Equity Share Capital (Face Value of Shares : Re. 1/-)	183.00	183.00	183.00
6	Earnings Per Share (of Re. 1/- each)			
	(a) Basic	(0.01)	(0.12)	(0.54)
	(b) Diluted	(0.01)	(0.12)	(0.54)

Notes:
1 The above is an extract of the detailed format of Financial Results for the quarter ended 30th June, 2021 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Financial Results are available on the website of Stock Exchange i.e BSE at www.bseindia.com and the Company's website www.dhenubuildconinfra.com

For Dhenu Buildcon Infra Limited
Sd/-
Vikash Maharishi
Director & CFO
DIN: 07073642

Place : Mumbai
Date : 11th August,2021

शिवसेनेची भिवंडी महापालिकेवर धडक

भिवंडी : शिवसेना भिवंडी शहर प्रमुख श्री. सुभाषजी माने साहेब यांच्या नेतृत्वाखाली आज शिवसेनेच्या शिष्टमंडळाने भिवंडी महापालिकेवर धडक दिली. भिवंडी शहरातील समस्यांचा पाढाच मा. आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या समोर वाचला गेला. *भिवंडीतील जनतेला लवकरात लवकर सर्व नागरी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात असे विनंतीवजा इशाराच भिवंडी शहर शिवसेनेच्या वतीने मा. आयुक्तांना देण्यात आला.*

कधी नव्हे इतके जबरदस्त योग्य नियोजन, बांधणी, आक्रमकपणा याची सांगड घालून चौफेर फटकेबाजी करत भिवंडीत शिवसेनेचे काम जोरात सुरु झाले आहे. *त्याचाच एक भाग म्हणून आज मंगळवार दि. १० आँगस्ट २०२१ रोजी शिवसेना शहर प्रमुख श्री. सुभाषजी माने साहेब यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पदाधिकाऱ्यांनी भिवंडी पालिका आयुक्त श्री. सुधाकर देशमुख यांची भेट घेतली.* प्रथम मा. आयुक्तांचे भिवंडी शहरात स्वागत म्हणून त्यांना पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा दिल्या. *त्यानंतर भिवंडी शहरातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि आरोग्य याविषयी चर्चा करुन नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा मिळत नसल्यामुळे चिंता व्यक्त केली. शहरात खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असुन बांधकाम विभागाला धारेवर धरण्यात आले. पिण्याच्या गढूळ पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे आणि अस्वच्छतेमुळे सार्वजनिक आरोग्याबाबत चिंता व्यक्त करुन यावर तात्काळ उपाययोजना करण्याच्या विनंतीवजा इशारा देण्यात आला.

सध्या श्रावण महिना सुरु झाला असुन याच महिन्यात हिंदू धर्मियांच्या सणांना सुरवात होते. गणेशोत्सवासारखा मोठा सण दारात येऊन ठेपल्याने रस्ते दुरुस्ती करणे गरजेचे असल्याची महत्त्वाची सूचना करण्यात आली. *मा. आयुक्तांची पहिलीच भेट आणि त्यांनी नुकतेच चार्ज हाती घेऊनही त्यांनी जनतेचे प्रश्न तात्काळ मार्गी लावावे अशी आग्रहाची मागणी भिवंडी शिवसेनेने केली. अन्यथा शिवसेनेला पालिकेच्या विरोधात रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा देण्यात आला.* तसेच अनेक महत्त्वाच्या विषयावर चर्चा झाली असून लवकरात लवकर ज्या ज्या सुविधा देता येतील त्या शिवसेनेच्या सहकार्याने देऊ असे आश्वासन मा. आयुक्त सुधाकर देशमुख यांनी शिवसेना शिष्टमंडळाला दिले. या शिष्टमंडळात शहर सचिव श्री. महेंद्र कुंभारे, पश्चिम विधानसभा संघटक श्री. मदन भोई, पूर्व विधानसभा सचिव श्री. गोकुळ कदम, पश्चिम विधानसभा संघटक श्री. दिलीप कॉंडलेकर, महिला संघटक (पूर्व) श्रीमती कोमलताई पाटील, उपशहर प्रमुख श्री. संजय काबूकर, श्री. श्रीनाथ पाटील, श्री. मनोज गगे, श्री. राकेश मोरे, श्री. राम शिगवण इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते!

VINTAGE COFFEE AND BEVERAGES LIMITED
(Formerly known as Spaceage products Limited)
B-702, 7th Floor, Neelkanth Business Park, Kirol Village, Near Bus Depot, Vidyavihar West Mumbai City MH 400086 IN
Email id: roc.spaceage@gmail.com CIN: L15100MH1980PLC267131
Statement of Standalone Unaudited Financial Results for the Quarter ended June 30th 2021
(Rs. in lakhs)

Sr. No.	Particular	Quarter Ended 30.06.2021 Unaudited	Quarter Ended 31.03.2021 Audited	Quarter Ended 30.06.2020 Unaudited	Year Ended 31.03.2021 Audited
1.	Total Income from Operations	0	4.20	1.24	21.24
2.	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)	(8.58)	2.13	0.11	14.68
3.	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items)	(8.58)	2.13	0.11	14.68
4.	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items)	(8.58)	(0.14)	0.09	9.67
5.	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	(8.58)	(0.14)	0.09	9.67
6.	Paid-up Equity Share Capital (Face Value Rs 10/- each)	312.47	312.47	312.47	312.47
7.	Other Equity Reserves (excluding Revaluation Reserve)	13.01	13.01	13.01	13.01
8.	Earnings Per Share (of Rs.10/- each) (for continuing and discontinued operations) - 1. Basic: 2. Diluted:	(0.27)	(0.00)	0.00	0.31

Notes: -
1. The above results were reviewed by the Audit Committee and thereafter taken on record by the Board of Directors in their meeting held on 11th Aug, 2021 after review by Audit Committee.
2. The above is an extract of the detailed format of quarterly & year to date financial results filed with the stock exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly & year to date financial results are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and the company's website (www.spaceageproducts.co.in).

For and on behalf of
Vintage Coffee And Beverages Limited
Sd/-
Balakrishna Tati
Managing Director
DIN: 02181095

Place: Mumbai
Date: 11.08.2021

बृहन्मुंबई महानगरपालिका
आश्रय योजना सेल

क्र. : डीवायसीएचई/३६३/एवायसी दिनांक : १० ऑगस्ट, २०२१

लघु ई-निविदा सूचना

विभाग :	मु. अभि. (घकव्य)
उप-विभाग :	उप मु. अभि. एवायसी
निविदा क्र. :	२०२१_एमसीजीएम_७११४९४
विषय :	ई वार्ड मध्ये फेज-I करिता आश्रय योजने अंतर्गत विंग ए व बी चे सिद्धार्थ नगर रिडेवलपमेंट येथील निवास यूनिट्स करिता अग्निशमन कामांची एसआयटीसी.
सदनिकांची सं. :	१५० नग
ई. र. ठे. :	रु. १,८२,१०८/-
निविदा विक्री :	१२.०८.२०२१, स. ११.०० वा. ते ०१.०९.२०२१, दु. १२.०० वा. पर्यंत
संकेतस्थळ :	https://mahatenders.gov.in
संबंधित व्यक्ती :	सहाय्यक अभियंता (एम व ई) एवायसी
नांव :	श्री अजय राणे
दूरध्वनी क्र. :	८९७६२२९१६५
ई-मेल आयडी :	ae01ayc.swm2@mcgm.gov.in

सही/-
उप मु. अभि. (एवायसी) प्रभारी
पीआरओ/८३७/जाहि./२०२१-२२

पाण्याचा अपव्यय टाळा-वाहत्या नळाखाली कपडे-भांडी धुऊ नका.

विठ्ठलवाडी - उल्हासनगर रेल्वे स्टेशन दरम्यान

हजारो कुटुंब बेघर होण्याच्या भितीच्या सावटाखाली

उल्हासनगर, / प्रकाश सोनवणे : विठ्ठलवाडी ते उल्हासनगर रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे रुळाचे चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. या कामादरम्यान विठ्ठलवाडी पश्चिम व उल्हासनगर पूर्व भागातील रेल्वे रुळालगत असणाऱ्या मागासवर्गीय झोपडपट्ट्यांना विश्वासात न घेता त्या हटविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे या झोपडपट्टीतील हजारो कुटुंब हे बेघर होण्याच्या भितीने तणावाखाली जगत आहेत. विठ्ठलवाडी ते उल्हासनगर दरम्यान धोबीघाट, वसिटा कॉंलनी, भिमकॉंलनी, ईंदिरानगर, या सारख्या अनेक मागासवर्गिय समाजाच्या झोपडपट्ट्या मागील ५ दशकांपासून वसलेल्या आहेत. उमपा हद्दितील करदाते रहिवाशी आहेत. या कामगार मजुरांच्या वस्त्या आधिच कोरोना आणि लॉंकडाऊनने उपासमारी व मानसिक तणावात जिवन जगत आहेत. गत दोन महिन्यापांसून या झोपडपट्टीतील रहिवाशांना कोणतीही लेखी सुचना न देता रेल्वे रुळ विस्तारीकरणा साठी या झोपडपट्टींचे सर्वेक्षण करणे, प्रतिनीधीं कडून माहिती संकलन करणे, घरांना अनुक्रमांक नोंदविण्याचे काम सुरू आहे. मात्र, कोणत्याही पूर्वसूचना न देता हे प्रतिनिधी बाधित होणाऱ्या घरांवर अणूक्रमांक टाकण्याचे काम करीत आहेत. परिणामी, या वसतीतील महिला - पुरुष, लहान मुलं, तरुण वयोवृद्धाचे मनात बेघर होण्याची असुरक्षित भावना निर्माण झाली आहे. असा मागास झोपडपट्टी विस्थापन समितीचे अध्यक्ष राजकुमार कांबळे यांनी केला आहे. लगतच्या उल्हासनगर महानगरपालिका हद्दितील मागासवर्गीय अनुसूचित जाती, अ.जमाती, भटक्या विमुक्त जाती जमातीच्या झोपडपट्टी आहेत. रेल्वे रुळाच्या चौपदरीकरण करतांना यात बाधित होणार्या कुटुंबांचे पुणे/नागपुर महानगर रेल्वे जागेवरिल मागास. झो.पु.२७ मे २०२० तसेच २७ एप्रिल२०२१६ ऐरोली-घोडबंदर,दिघा-कळवा रेल्वे प्रकल्पबाधित झो.पु.३१जाने२०२० या पार्श्वभूमीवर पुर्नवसनाची खात्री द्यावी अन्यथा उग्र आंदोलन छेडणार असल्याचा ईशारा देणारे निवेदन कांबळे यांनी मनपा आयुक्त व रेल्वे व्यवस्थापकांना समितिच्या वतिने दिले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी. जि.ठाणे.

जाहीर ई निविदा

खालील कामे करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदाराकडून ई निविदा मागविण्यात येत आहे.

ई निविदा क्रं/ ई निविदा फी/ कामाचे स्वरुप :	ई निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख
वैआवि /ई-नि.क्र.३/२०२१-२२/रु.३०००/- कोविड - १९ तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर साथरोग नियंत्रणाकरीता DCH/DCHC साठी Ventilator पुरविणे	दि. २०/०८/२०२१ सांय. ४.०० वा. पर्यंत

सदर ई निविदा मनपाच्या संकेतस्थळ bnmc.maharashtra.etender.in वर दि. १२/०८/२०२१ पासुन उपलब्ध आहेत. आपल्या ई निविदा वर नमुद केलेल्या तारखेच्या १५.०० वाजे पर्यंत पाठविण्यात याव्यात.

सही/-
वैद्यकिय आरोग्य अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

DHANLAXMI COTEX LIMITED
CIN: L51100MH1987PLC042280
Regd. Off: 285, 2nd Floor, Jhawar House, Princess Street, Mumbai - 400002
PHONE : 022-4976 4268 | Website : www.dcl.net.in
E-mail : dcotex1987@gmail.com / accounts@dcl.net.in
Extract of Un-audited Financial Results for the for the quarter ended June 30, 2021
BSE Code: 512485 (Rs. In Lakhs)

Particulars	Quarter ended 30th June 2021 (Unaudited)	Quarter ended 31st March 2021 (Audited)	Corresponding Quarter ended 30th June 2020 (Unaudited)	Year ended on 31st March 2021 (Audited)
Total income from operations & other revenue	698.61	361.57	76.34	692.60
Net Profit / (Loss) (before tax and/or extraordinary items)	204.32	40.70	39.42	47.20
Net Profit / (Loss) for the period before tax (after Extraordinary items)	204.32	43.27	39.42	45.14
Net Profit/ (Loss) after tax (after extraordinary items)	155.34	42.94	35.42	27.84
Total Comprehensive income for the period [comprising profit/(loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax)]	852.98	240.64	500.98	1354.25
Equity Share Capital	487.14	487.14	487.14	487.14
Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year)	0.00	0.00	0.00	3098.47
Earnings Per Share (of 10/- each) (for continuing and discontinued operations)				
Basic :	3.19	0.88	0.73	0.57
Diluted:	3.19	0.88	0.73	0.57

Note:
1. The above Standalone Unaudited financial results for the quarter ended 30.06.2021 have been reviewed by Auditors, Audit Committee in their meeting held on 11th August, 2021 and have been approved by the Board of Directors in their meeting held on 11th August, 2021.
2. The above is an extract of the detailed format of year ended Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarter and year ended Financial Results are available on the Stock Exchange websites. (www.bseindia.com) and on the Company's website (www.dcl.net.in).

For Dhanlaxmi Cotex Limited
Sd/-
Mahesh S. Jhawar
(Whole TIme Director)
DIN: 00002908

Place : Mumbai.
Date: 11.08.2021